महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

**महत्वाचे :**

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२१/ /५०
दिनांक : 14 JAN 2021

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था, औरंगाबाद विभाग.

**विषय - शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ :
१ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७, दि. ०३/१२/२०२०.
२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/१३, दि. १३/०१/२०२१.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे (संकेतस्थळ - https://mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

संदर्भीय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता, महाडीबीटी पोर्टल दि. ०३/१२/२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना खालील प्रमाणे सूचित करण्यात येते की,

१. संस्थांनी Institute Profile अंतर्गत सर्व माहिती जसे Fee details etc. अद्ययावत करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.
२. सर्व पात्र विद्यार्थ्यांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी सूचना देण्यात यावी तसेच, संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये प्राप्त होणारे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.
३. तसेच, **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना"** या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना, विद्यार्थी शिक्षणासाठी वसतिगृहामध्ये किंवा पेईंगगेस्ट म्हणून राहात असल्याबाबतची संपूर्ण शहानिशा करुनच योजनेच्या अटी व शर्तीनुसार अर्ज तपासणी (मंजूर/नामंजूर) करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.
४. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.
५. विद्यार्थ्यांने एकाच वर्षाकरिता दोन-दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.